देशोन्नती दिनांक:- 14/4/2021

# गावठी पिस्तुलसह चार जिवंत काडतूस जप्त



## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; आरोपी अटकेत



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ शहरातील नंदीग्राम सोसायटी येथील कमानीजवळून एका आरोपीस ताब्यात घेवून त्याच्याकडून गावठी पिस्तुलसह चार जिवंत काडतूस जप्त केल्याची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने १३ एप्रिल रोजी केली आहे. या घटनेतील आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

जिल्हा पोलिस अधिक्षक प्रमोद शेवाळे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर व त्यांच्या अधिपत्याखालील पोलिस पथकास नांदेड शहरातील गुन्हेगारांचा शोध घेवून त्यांच्यावर पाळत ठेवून कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यावरून पोलिस निरीक्षक चिखलीकर यांच्या अधिपत्याखालील पथकाने १३ एप्रिल रोजी गुन्हेगारांचा शोध व माहिती घेण्यासाठी पेट्रोलिंग करीत असतांना नंदीग्राम सोसायटीत राहणारा आरोपी गोविंदसिंघ हरिसिंघ पुजारी याच्याकडे एक गावठी पिस्तुल असल्याची माहिती खबऱ्याकडून मिळाली. पोलिस पथकाने त्यास नंदीग्राम सोसायटीच्या कमानीजवळ ताब्यात घेवून त्याच्याकडील गावठी पिस्तुल व चार जिवंत काडतूस जप्त केले. सहाय्यक पोलिस निरीक्षक भारती यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी गोविंदसिंघ हरिसिंघ पुजारी याच्याविरुध्द विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.